जा.क्र./मनपा/उप.अ/११५/२०१७ दि.२० /६/२०१७

# दरपत्रक सूचना(Closed Offer)

मा. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) हे खालील कामांकरिता सर्वजनिक बांधकाम विभाग/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचे नोंदणीकृत पात्र ठेकेदारांकडून खालील कामांसाठी दरपत्रके (Closed Offer) मागवीत आहेत. दरपत्रके दिनांक २७ /७ /२०१७ रोजी दुपारी ०४.०० वाजे पर्यंत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा, यांच्या कार्यालयात स्वीकारण्यात येतील. शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील. प्राप्त दरपत्रके स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त महोदय यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा. रक्कम | १% इसारा रक्कम रु. | ठेकेदाराचा वर्ग | निविदा प्रक्रियाकिती वेळेस झाली |
|---|---|---|---|---|---|
| १ | वार्ड क्र.८५ अंतर्गत संजयनगर गल्ली क्र. ७,८,९ व ८ ए ८ बी येथे १०० मि.मी. तसेच १५० मि.मी. व्यासाची डी.आय.के-७ जलवाहिनी टाकणे बाबत. | ७,३७,४७९.९०/- | ७३७४.७९/- | १ ते ७ | ४ वेळेस |

**अटा व शर्था :** (१) दरपत्रके दोन लिफाफयांत सादर करण्यत यावीत. पहिल्या लिफाफयात १% इसारा रकमेचा उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेचा D.D. अथवा मनपा कार्यालयात रोख रक्कम जमा केल्याची पावती टाकण्यात यावी व लिफाफा क्र.०२ मध्ये दरपत्रक टाकण्यात यावेत. (२) कंत्राटदारास बी-१ निविदेच्या सर्व अटी व शर्थी लागू राहतील. (३) सदर कामाची निविदा किंमत देयकातून वसूल केली जाईल. (४) कामगार कल्याण निधीची १% रक्कम देयकातून कपात करण्यात येईल. (५) निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर निविदा धारकांनी निविदाधीन किमतीच्या १% एवढया किमतीची रोख रक्कम जमा केल्याची पावती किंवा डिमांड ड्रॉफ्ट अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) म्हणून सादर करावा. (उदा. १% ते १०% कमी दर - १% रक्कम) निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने आहे तेवढया किमतीची रोख रक्कम जमा केल्याची पावती किंवा डिमांड ड्रॉफ्ट सादर करावा. (१४% कमी दर - १०% पर्यंत करीता - १% व (१४% - १०%) -४% असे एकूण ५%). (६) कंत्राटदार ज्या कामांसाठी दरपत्रक देणार आहे. त्या कामाचा स्पष्ट उल्लेख बंद लिफाफ्यावर करण्यात यावा. (७) वरील कामांपैकी रस्ते कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामासाठी दोष व दाईत्व कालावधी (D.L.P) . . . .वर्षाचा राहील तसेच इतर कामांसाठी दोष व दाईत्व कालावधी तीन वर्षाचा राहील. (८) निधी उपलब्धतेनुसार देयक अदाई करण्यात येईल. (९) दरपत्रकात दर अंकात व अक्षरी स्पष्ट लिहावे. (१०) डी.आय.के-७ पाईपच्या खरेदी करीता अबकारी कर सवलत मिळण्यासाठी प्रमाणपत्र देण्यात येईल. (११) पाईप खरेदीचे बिल व उत्पादक कंपनीचा टेस्ट रिपोर्ट सादर करणे बंधनकारक आहे. (१२) काम सुरु असतांना कामाची छायाचित्रे घेणे बंधनकारक आहे. (१३) काम सुरु असतांना सुरक्षेच्या दुष्टीने करावयाचा उपाययोजना राबविणे, वाहतूकीस अडथळा होणार नाही या बाबतीत दक्षता घेणे बंधनकारक आहे. (१४) सदरील कामांसाठी दोन महिने मुदत आहे. (१५) महानगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या बदलांची / सूचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. (१६) मागील सात वर्षा मध्ये कंत्राटदाराने याच स्वरुपाचे - (i) निविदा किमतीच्या ४०% किमती एवढया रकमेची किमान तीन कामे किंवा. (ii) निविदा किमतीच्या ६०% किमती एवढया रकमेची किमान दोन कामे किंवा. (iii) निविदा किमतीच्या ८०% किमती एवढया रकमेचे किमान एक काम ·१५-६·२०१६ पर्यंत समाधानकारक रित्या पुर्ण केलेले असले पाहिजे. काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. (१७) जी.एस.टी. नोदणी आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता
महानगरपालिका, औरंगाबाद